# जिल्हा परिषद रत्नागिरी (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग)

## जाहिरात क्र.१/२०१८

महाराष्ट्र शासन ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.आपना१००२/प्रक१२७/पापु१५ दिनांक२८.८.२००२ अन्वये ग्राम स्तरावरील प्रत्येक विंधण विहीरीची देखभाल व दुरुस्ती हि वेळीच व परिणामकारक व्हावी यासाठी, रत्नागिरी जिल्हा परिषदेला विंधण विहीरीवरील हातपंप दुरुस्ती व देखभालीसाठी कंत्राटी पध्दतीने दोन मदतनीस नेमण्याचे आहेत.खालील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांकडुन विहीत नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.अर्जाचा विहीत नमुना सोबत देण्यात येत आहे.तसेच कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावणेत आलेला आहे.परिक्षेचे स्वरुप तसेच निवड प्रक्रियेबाबतचा सविस्तर तपशिल नमुना अर्जाच्या सहपत्रात नमूद करण्यात आला आहे.विहीत नमुन्यातील अर्ज कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी (पहिला मजला) या कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि.३१.१२.२०१८ पर्यंत स्विकारणेत येतील.अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात.परिक्षा शुल्क खुला वर्ग रक्कम रु. २००/- मागास प्रवर्ग रक्कम रु.१००/- कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जि. प. रत्नागिरीयांचे नावे काढून अर्जासोबत जोडावा.

१) हातपंप दुरुस्तीसाठी जिल्हा पातळीवरील पथकावर मदतनीस पदासाठी खालील अहर्ता व इतर पात्रता असाणा-या व्यक्तिनी अर्ज करावेत.एकूण पदसंख्या ०२ (रत्नागिरी मुख्यालय)

१.शैक्षणिक अहर्ता - आठवी पास

२. दिनांक १ सप्टेंबर २०१८ रोजी वयोमर्यादा-खुला वर्ग-१८ ते ३८ वर्ष व मागासवर्गीय-१८ ते ४३ वर्ष

३. एकत्रित मासीक मानधन रु ६,०००/-

४.नेमणूकीचा कालखंड- ११ महिने

५.पात्र उमेदवारांची संख्या जास्त असल्यास उमेदवारांची निवड लेखी परिक्षेव्दारे केली जाईल. व उमेदवारांची संख्या कमी असल्यास मुलाखतीव्दारे निवड करण्यात येईल.

६.सदर पदाचे काम अवजड स्वरुपाचे व जिल्हा फिरती असल्यामुळे पुरुष उमेदवरांना प्राधान्य देण्यात यईल.

**पदाची कर्तव्य व जबाबदा-या** - हातपंप दुरुस्ती पथकासोबत जिल्हयातील नादुरुस्त हातपंपाची मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे.तसेच निकामी झालेले हातपंप काढून नवीन हातपंप बसविणे,पथकासाठी आवश्यक साहीत्याची मागणी करणे.तसेच इतर अनुषंगिक कामे करणे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

# जाहिरात क्र.०१/२०१८ सोबतचे सहपत्र

## महत्वाच्या सूचना-अटी व शर्ती

१. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,वयाचा पुरावा,जातीचा दाखला व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.तसे न केल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारण्यात येईल.

२.लिफाप्यावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

३. उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात ३० से.मी. २० से.मी. आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजूला संगणकावर टंकलिखित करुन अर्ज करावा.

४.उमेदवारांने पासपोर्ट आकाराच्या अलिकडील रंगीत फोटो लावून त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

५.अनुभव प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

६.अर्जासोबत २३ X १३ से.मी. आकाराच्या स्वत:चे नाव व पत्ता असलेला रु.१०/- तिकिट लावलेला एक लिफाफा पाठवावा.

७.उमेदवारांनी विहीत नमुन्यात भरुन पाठविलेली आवेदन पत्रे जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ते रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत किंवा तत्पूर्वी कार्यालयात पोहचतील अशा बेताने पाठवावीत.कोणत्याहीकारणाने विलंबाने प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

८.अर्जाची छाननी करुन अर्जाची संख्या जास्त झाल्यास मदतनीस पदासाठी पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेस बोलावण्यात येईल.लेखी परिक्षेसाठी उमेदवाराना स्वखर्चाने परिक्षेच्या ठिकाणी हजर राहावे लागेल. याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

९.लेखी परिक्षेबाबतचे वेळापत्रक **www.ratnagiri.nic.in** या संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.निवड झालेला उमेदवार ८ दिवसात कार्यालयात हजर न झाल्यास सदरहु नियुक्तीचे आदेश रदद समजणेत येईल.

१०.न्यायालयीन स्थगिती/निवाडा किंवा शासन निर्णयामुळे निवड प्रक्रिया कुठल्याही स्तरावर स्थगित किंवा रदद करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.

११.कंत्राटी पध्दतीने नेमणूक असल्याने स्थायी/कायम कर्मचारी म्हणून भविष्यात हक्क असणार नाही.तसेच या संदर्भात न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१२.विहीत पात्रता धारण न करणा-यांचे अर्ज अपूर्ण अथवा चुकीचे भरलेले अर्ज,संगणकावर टंकलिखित नसलेले अर्ज,वय, शैक्षणिक अर्हता,जातीचा दाखला,अनुभव इ.संदर्भतील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज विहीत केलेले परिक्षा शुल्क न जोडलेले अर्ज,विहीत मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज, अन्य मार्गाने शुल्क भरलेले अर्ज प्रमाणपत्राच्या सत्यप्रती नसलेले अपात्र समजणेत येतील.

१३. निवड झालेनंतर १००/- चे मुद्रांक पेपवर सहपत्र.२ मध्ये नमुद असलेल्या अटी शर्तीनुसार करारपत्र करुन दयावे लागेल.

**परिक्षेचे स्वरुप-**

१. मदतनीस या पदासाठी परिक्षा १०० गुणांची घेणेत येईल.

२.मदतनीस या पदासाठी परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील उच्च प्राथमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल.

मुख्य कार्यकारी अधिकारी<br>
जिल्हा परिषद रत्नागिरी.

## सहपत्र-२

## करारनाम्यातील अटी व शर्ती

नेमणूक दिल्यानंतर संबंधीताने रु.१००/- च्या बाँडपेपरवर करारनामा करुन देण्याचा असून त्यामधील अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील.

१.मदतनीस या पदावरील नेमणूक कालावधीत फक्त ११ महिन्यासाठी असून सदर नेमणूक ही पूर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची आहे.तसेच कोणतीही आगाऊ सूचना न देता सेवेतून कमी करण्यात येऊ शकेल तसेच नेमणूकीचा ११ महिन्याचा कालावधी पूर्ण होताच सेवा आपोआप समाप्त होईल.कामकाज समाधानकारक नसलेस करण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही वेळी रदद करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२.नोकरीत हजर झालेनंतर सेवेचा राजीनामा देणेचा असेल तर १ महिन्याची आगाऊ नोटीस देणे आवश्यक आहे.आगाऊ नोटीस न दिल्यास एक महिन्याचे मानधन कार्यालयात जमा करावे.

३.उमेदवाराची नेमणूक करार पध्दतीने असलेने कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

४. शिस्तभंग विषयक कारवाई बाबत शासन निर्णयानुसार कारवाईस पात्र राहील.

५. उमेदवारास सदरील नियुक्ती काळात सार्वजनिक सुटयांव्यतिरिक्त ८ दिवस किरकोल रजा अनुज्ञेय राहील.

६.नेमणूकीच्या कालावधीत पुरविण्यात आलेल्या साहीत्यापैकी वापरलेले साहीत्य तसेच शिल्लक राहीलेले साहीत्य याचा हिशोब दरमहा सादर करणेचा आहे.सेवा समाप्तीवेळी अखर्चित साहित्यासह हत्यारे,अवजारे कार्यालयात जमा करण्याची आहेत.तसेच केलेल्या कामाचा अहवाल दरमहाच्या ५ तारखेपूर्वी सादर करणेचा आहे.

वरील अटी व शर्ती मध्ये आवश्यकते बदळ करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.